# संत एकनाथ

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बा-वा.
दा. क्र. ४२८



BVBK-0400428

ज्योत्स्ना

बा. वा.
नों. क्र. ४२८

# संत एकनाथ

: लेखक :

**भा. म. वैद्य**

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. ४२८ दिनांक .......
विषय बा. वा. ..........

BVBK-0400428

ज्योत्स्ना प्रकाशन

मूल्य एक रुपया

मुलांनो,

संत एकनाथांनी संसार व्यवस्थितपणे करून परमार्थ साधला. समाजात एकोपा राहावा म्हणून त्यांनी केलेले प्रयत्नही विशेष होत. त्यांच्या चरित्रापासून आजच्या परिस्थितीतही आपणास पुष्कळ घेण्यासारखे आहे.

माझ्या ह्या लहानशा प्रयत्नाचे आपण स्वागत कराल अशी मी आशा बाळगतो.

एकनाथ चरित्राची रचना करताना मला ज्या ग्रंथांचा उपयोग झाला त्या ग्रंथकर्त्यांचा मी आभारी आहे.

सदैव तुमचाच,
**भालचंद्र वैद्य**

मुद्रक : एच. बी. घाणेकर, न्यू एज प्रिंटींग प्रेस, ८५, पी. बाळू मार्ग, मुंबई २५.
प्रकाशक : लक्ष्मण गोपाळ परांजपे, ३० सी, खोताची वाडी, गिरगाव, मुंबई ४.

# १. संत एकनाथ

मुलांनो, आपल्या भारतात अनेक पराक्रमी शूर वीर होऊन गेले; तसेच अनेक साधुसंतही झाले. अशा थोर संतांपैकीच एकनाथ हे एक होत.

पैठण हे शहर पूर्वी भारताच्या दक्षिणेकडील मोठे पवित्र शहर होते. त्याला दक्षिणेकडील काशी असेही म्हणत.

ह्या पैठण शहरात संत भानुदासांच्या कुळात एकनाथांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सूर्यनारायण व आई रुक्मिणीबाई.

एकनाथांच्या जन्मानंतर थोड्याच दिवसांत त्यांचे आई-वडील देवाघरी गेल्यामुळे त्यांचे आजोबा चक्रपाणी व आजी यांनी त्यांचे पालन केले. आपल्यामागे आपल्या कुळात हा एकटाच म्हणून आजोबांनी त्यांचे नाव एकया असे ठेविले. त्याचेच पुढे एकनाथ असे झाले.

लहानपणापासूनच एकनाथांचे लक्ष देव-भजनाकडे असे. त्यांची हुशारी पाहून सहाव्या वर्षी आजोबांनी त्यांची मुंज केली व त्यांना शिक्षण देण्यासाठी एका विद्वान पंडितांची नेमणूक केली.


सगळ्या शास्त्रांबरोबरच रामायण, महाभारत व पुराणांचा एकनाथांनी अभ्यास केला. नाथांची हुशारी पाहून आजोबा-आजींना

खूप आनंद वाटे. पैठणातील सगळ्यांचेच एकनाथ आवडते होते. लहानपणापासूनच त्यांचे लक्ष परमेश्वर-भजनात गुंगून जाई.

त्यांचे लहानपणाचे खेळ म्हणजे पूर्वीच्या संतांप्रमाणे भजन करणे, दिंडी काढणे व खांद्यावर पताका घेऊन नाचणे असे होते. एकदा ते परमेश्वर-चिंतनात गुंतले म्हणजे त्यातच ते गुंगून जात. इतर कोणत्याच गोष्टीकडे त्यांचे लक्ष जात नसे. नाथांची ही भक्ती पाहून आजोबा-आजींना धन्यता वाटे.

## २. गुरूच्या शोधात

एक दिवस नाथ शंकराच्या देवळात एकटेच परमेश्वर-चिंतनात गुंग झाले असता त्यांना एक आवाज ऐकू आला. "नाथा, ऊठ आता. गुरूच्या शोधाला लाग. देवगडावर जनार्दन-स्वामी आहेत. त्यांच्याकडे जाऊन त्यांना गुरू कर." हे शब्द



ऐकून नाथांना खूप आनंद वाटला नि लागलीच ते अंधारातूनच गुरूच्या शोधासाठी निघाले.

मधूनच त्यांना घरची आठवण होई पण लगेच मनात घराचा विचार न आणता ते पुढे जात.

इकडे रात्री एकनाथ घरी आला नाही म्हणून शोधाशोध सुरू झाली. पण नाथांचा शोध लागला नाही. बिचारी आजोबा-आजी दुःखी-कष्टी झाली. पैठणांतील सर्वांनाच वाईट वाटले. सगळ्यांनी त्यांच्या आजोबा-आजींना धीर दिला.

इकडे एकनाथ सतत तीन-चार दिवस तहान-भूक विसरून हरिभजन करीत चालत राहिले. चौथ्या दिवशी ते देवगडावर (हल्लीचे दौलताबाद) येऊन पोचले. ती वेळ सकाळची होती. जनार्दन स्वामी ईश्वर-चिंतनात मग्न होते. अशा वेळी एकनाथ त्यांच्या समोर हात जोडून उभे राहिले. गुरू भेटल्याचा त्यांना खूप आनंद झाला होता.

## ३. गुरूची भेट

जनार्दनस्वामींची समाधी संपली. त्यांनी समोर पाहिले. एक १२-१५ वर्षांचा मुलगा हात जोडून उभा असलेला त्यांना दिसला. त्याला पाहून स्वामी म्हणाले, बाळा, कोण तू ? तुझं नाव काय ? तू कोठून आलास ? कशासाठी आलास इथे ? यावर न गोंधळता एकनाथ म्हणाले, स्वामी ! मी आपला शिष्य, माझे



ए. २

नाव एकनाथ. मी पैठणाहून आलो, आपला कृपाप्रसाद मिळविण्यासाठी. इतके बोलून एकनाथांनी स्वामींचे पाय धरले नि म्हटले : महाराज, मला आपला म्हणा.

लागलीच स्वामींनी त्यांना उठविले नि प्रेमाने आपल्या-जवळ आसनावर बसवून घेतले. मग स्वामी म्हणाले : बाळा, आधी तुझी सगळी माहिती सांग; मग मी तुला शिष्य करून घेईन.

एकनाथांनी आपली खरी माहिती स्वामींना सांगितली. स्वामींना समाधान वाटले. त्यांनी एकनाथांना आपल्या घरी ठेवून घेतले.

## ४. नाथांना गुरूपदेश

स्वामींकडे राहिल्यापासून एकनाथांनी त्यांची मनापासून सेवा करायला सुरुवात केली. घरची सगळी लहानसान कामे नाथ करू लागले. नाथांचा नम्रपणा नि सेवा पाहून जनार्दन-स्वामींना संतोष झाला.

घरचा हिशेब रोज संध्याकाळी लिहिण्याचे काम नाथ करीत असत. एके दिवशी हिशेब पुरा करताना एका पैशाची चूक झाल्याचे आढळले. नाथ हिशेब पुन्हा पुन्हा तपासू लागले. काही केल्या चूक सापडेना. खूप रात्र झाली तरी एकनाथाच्या खोलीत उजेड पाहून एकनाथ अजून झोपला का नाही हे

पाहण्यासाठी स्वामी त्यांच्या खोलीत गेले, पण एकनाथांचे सगळे लक्ष हिशेब तपासण्याकडे असल्यामुळे त्यांना स्वामी आल्याचेही कळले नाही.



इतक्यात चूक सापडली. एकनाथांनी आनंदाने टाळी वाजविली. समोर जनार्दनस्वामींना पाहून त्यांनी स्वामींचे पाय धरले. स्वामी म्हणाले: एकनाथा, तुला कसला एवढा आनंद झाला? एकनाथांनी हिशेबातील एक पैशाची चूक सापडली म्हणून सांगताच स्वामी हसून म्हणाले, नाथा, एवढीशी चूक शोधण्यासाठी तू इतका एकाग्र झालास, असाच परमेश्वर-चिंतनात एकाग्र झालास तर परमेश्वर तुला लवकर प्रसन्न होईल हाच गुरूपदेश समज.

नाथांना गुरूपदेश मिळाला. पुढे ते सतत ईश्वर-चिंतनात मग्न राहू लागले.

# ५. नाथांची तपश्चर्या

एके दिवशी स्वामींनी एकनाथांना बोलावून म्हटले,

नाथा, आता काही काळ तुला तपश्चर्या केली पाहिजे. येथून जवळच ' शूलभंजन डोंगर आहे. तेथे तुला एकांत मिळेल. तो प्रदेश पण सुरेख आहे; तेथे जाऊन अनुष्ठानास बैस नि आपले मन परमेश्वर-चिंतनात एकाग्र कर आणि जेव्हा एखादी चमत्कारिक गोष्ट घडेल तेव्हा मला येऊन सांग.

जशी आपली आज्ञा ! असे म्हणून दुसऱ्या दिवशी नाथ गुरुजींनी सांगितलेल्या डोंगरावर गेले. तेथे परमेश्वर चिंतनासाठी बसण्याकरिता योग्य अशी जागा साफसूफ करून घेतली. जवळच एक सूर्यकुंड होते, त्यामुळे त्यांच्या स्नानाचीही चांगली सोय झाली. याच अरण्यात पूर्वी मार्कंडेय ऋषींनी तपश्चर्या केली होती. तेथे ध्यानस्थ बसण्याचा दिनक्रम नाथांनी सुरू केला.

ह्या डोंगराच्या पायथ्याशी एक लहानसे खेडे होते. त्या खेड्यातील एक गवळी रोज सकाळी दूध घेऊन ते विकण्यासाठी दुसऱ्या गावी जात असे. एके दिवशी तो डोंगरमाथा चढून वर आला तो त्याला ध्यानस्थ बसलेले नाथ दिसले. त्या बाल-योग्याचे तेज पाहून गवळ्याने मोठ्या भक्तीने हात जोडले, नि आपल्या जवळील थोडे दूध एका भांड्यात ओतून ते भांडे त्याने नाथांसमोर ठेविले व तो पुढे निघून गेला.

तो दूध विकून परत आला तरी नाथ ध्यानस्थच होते. दुधाचे भांडे तसेच शेजारी होते. इतक्यात नाथ सावध झाले.

डोळे उघडून पाहतात तो समोर दुधाने भरलेले भांडे, त्यांना मोठे आश्चर्य वाटले. तोच तो गवळी पुढे येऊन नाथांना नमस्कार करून म्हणाला: महाराज, ते दूध मी आपणासाठी ठेविले आहे. ते घ्या. माझे म्हाताऱ्याचे ऐका--

नाथांनी त्या गवळ्याला नमस्कार केला व दूध घेतले. गवळ्याला समाधान वाटले. असे रोज घडत होते.

एके दिवशी नाथ ध्यानस्थ बसले असता एक भयंकर नाग नाथांजवळ आला. त्याने नाथांना वेढले नि आपली फणा नाथांच्या



डोक्यावर छत्राप्रमाणे धरली तरी नाथांना काही कळले नाही. नाथांची समाधी उतरण्याच्या सुमारास तो नाग निघून गेला. असे बरेच दिवस चालले होते.

एके दिवशी हे सगळे त्या गवळ्याला दिसले. तो नाथां-जवळ आला नि हा भयंकर सर्प नाथांना चावेल म्हणून त्याने

आरडाओरडा केला. त्यामुळे नाथ सावध झाले. पाहतात तो भयंकर नागाने आपणास वेढले आहे. पण नाथ घाबरले नाहीत. सर्पानेही नाथांना काही इजा न करता विळखा सोडला. नाथांनी दुधाचे भांडे त्या सर्पापुढे ठेविले. सर्प दूध प्याला नि लगेच निघून गेला.

हा विशेष प्रकार घडला हे पाहून नाथ जनार्दनस्वामींच्या दर्शनास आले व त्यांनी स्वामींना सर्व हकिकत सांगितली.

स्वामी म्हणालेः नाथा, आता तुझ्यावर पूर्ण कृपा झाली. आता तू येथेच राहा.

त्यानंतर लवकरच स्वामींनी नाथांना बरोबर घेऊन तीर्थ-यात्रा करावयाचे ठरविले.

एका शुभ दिवशी ते दोघे तीर्थयात्रेस निघाले. यात्रा करीत करीत ते नाशिकजवळ आले. तेथे त्यांना चंद्रभट नावाचे एक ब्राह्मण भेटले, त्यांच्या आग्रहावरून स्वामी व नाथ त्यांच्याकडे गेले. त्यांनी भागवताचे केलेले निरूपण ऐकून स्वामींना संतोष वाटला व त्यांनी नाथांना म्हटलेः एकनाथा, तू आता सर्वसाधारण लोकांसाठी मराठी भाषेत भागवताचे निरूपण कर. स्वामींची आज्ञा प्रमाण मानून एकनाथांनी भागवताचे मराठीत सुंदर निरूपण करण्यास सुरुवात केली.

पुढे आणखी तीर्थयात्रा करण्याची आज्ञा नाथांना करून जनार्दनस्वामी देवगडास परतले.

अनेक तीर्थांचे दर्शन घेत नाथ पैठणास आले, पण आपल्या घरी न जाता गावातील शंकराच्या देवळात उतरले.

# ६. नाथांचा शोध

इकडे आजोबा-आजी नाथांच्या शोधाचे प्रयत्न करीतच होते. नाथांचे आरंभीचे गुरूही नाथांचा शोध करीत गावोगावी फिरत होते. त्यांना जनार्दनस्वामींकडे नाथ असल्याचा शोध लागला. ते स्वामींकडे गेले व त्यांना नाथांच्या घरची सगळी हकिकत सांगितली. तेव्हा स्वामींनी नाथांना घरी पैठणास राहून आजोबा-आजींची सेवा करून तेथेच राहण्याचे आज्ञापत्र लिहून दिले. ते पत्र घेऊन पंडित परत पैठणास आले. त्यांनी नाथांना ओळखिले व चक्रपाणींना बरोबर घेऊन ते शंकराच्या देवळाकडे निघाले. तोच समोरून नाथ गावात येत असल्याचे दिसले. ते



जवळ येताच चक्रपाणींनी हाक मारली. नाथा, अरे कुठे होतास तू? नाथ थांबले. आजोबांनी त्यांना कडकडून मिठी मारली नि म्हटले: एकोबा, आमच्यावर का बरे रागावलास? चल आता घरी.

तुझी आजी वाट पाहात आहे. मी आता तुला कुठे जाऊ देणार नाही. पण नाथ म्हणाले, मला तीर्थयात्रा करण्याची गुरूंची आज्ञा आहे, तो मी कशी मोडू ? तोच पंडित पुढे होऊन त्यांनी नाथांना स्वामींचे आज्ञापत्र दिले.

नाथांनी गुरूंची आज्ञा प्रमाण मानून तेथेच राहण्याचे ठरविले. आजोबा-आजींना समाधान वाटले.

## ७. नाथांची कामगिरी

पैठणास कायमचे राहण्याचे ठरविल्यावर तेथे रोज आपल्याच वाड्यात नाथांनी प्रवचन व कीर्तनास सुरुवात केली. नाथांच्या कीर्तनास सर्वांनाच एकत्र बसण्याची मोकळिक होती. त्यामुळे नाथांच्या कीर्तनाला खूप गर्दी होऊ लागली. एकनाथ स्वतःच भजने, अभंग रचून म्हणत. ते सगळ्यांना आवडत असत.


पुढे लवकरच नाथांच्या आजोबांनी त्यांचे लग्न केले. नाथांच्या पत्नीचे नाव गिरिजाबाई. नाथांच्या घरी सर्वांनाच समानतेने वागविले जात असे. हा ब्राह्मण, हा इतर, हा हरिजन असला भेद त्यांच्याकडे नव्हता.

हे सगळे पैठणातील ब्राह्मणांना आवडत नसे. त्यांनी नाथांना निरनिराळ्या तऱ्हेने त्रास देण्याचा प्रयत्न केला; पण नाथांनी शांतपणे सगळेकाही सहन केले. एकदा तर एक माणूस नाथ गंगेचे स्नान करून घरी येत असता अनेक वेळा त्यांच्या अंगावर थुंकला; पण नाथ त्याच्यावर रागावले नाहीत.

त्यांनी प्रत्येक वेळी पुन्हा स्नान केले. हे पाहून त्या थुंकणाऱ्याला आपल्या कृत्याची लाज वाटून त्याने नाथांचे पाय धरले नि क्षमा मागितली. असे नाथ शांत स्वभावाचे होते.

सगळी माणसे कोणत्याही जातीची असली तरी सारखीच असे नाथ म्हणत.

एकदा भर दुपारी नाथ स्नान करून घरी येत होते. रस्त्यात एक लहान मूल वाळवंटात रडत चालले होते. नाथांना त्या बालकाची दया आली. त्यांनी चटकन त्या मुलाला उचलून घेतले,



त्याला प्रेमाने थोपटले नि त्याच्या आईचा शोध करून मुलाला तिच्या स्वाधीन केले. ते मूल एका हरिजनाचे होते. एकदा तर नाथ हरिजनाचे घरी भोजनासही गेले.

हे सगळे पाहून पैठणचे ब्राह्मण नाथांवर खूप रागावले. त्यांनी नाथांवर बहिष्कार घातला. पण नाथ त्यांच्यावर रागावले

नाहीत, त्यांनी सगळा त्रास सहन केला. त्यामुळे सगळ्यांना नाथांच्याबद्दल आदर वाटू लागला.

नाथ श्रीकृष्णाचे मोठे भक्त होते. त्यांची कृष्णलीलेची भजने, गवळणी प्रसिद्ध आहेत.

एकदा कर्नाटकातला एक सावकार सुंदर अशा विठ्ठल-रखुमाईच्या मूर्ती घेऊन पैठणास आला. त्याने नाथांच्या घराची चौकशी केली, तेव्हा काही दुष्ट लोकांनी नाथांची निंदा करून त्यांच्याकडे न जाण्याबद्दल त्याला सांगितले; पण सावकराने त्यांचे म्हणणे ऐकिले नाही. तो नाथांकडे आला व त्याने त्या मूर्ती नाथांना अर्पण केल्या. तो नाथांना म्हणाला: गेले काही दिवस मला स्वप्नात ह्या मूर्ती आपणास द्याव्या अशी भगवंताची आज्ञा होत आहे.

नाथांनी त्या मूर्तींचा स्वीकार करून शुभ मुहूर्तावर त्यांची स्थापना केली. सावकाराने संतुष्ट होऊन स्वतःच्या खर्चाने सुंदर देवालय बांधले. नाथांची कीर्तने ऐकून त्याला समाधान मिळाले. कित्येक दिवस कीर्तने ऐकत पैठणास राहून तो कर्नाटकात निघून गेला.

प्रत्येक प्राण्याच्या ठिकाणी भगवंत असतो असे नाथ म्हणत. एकदा काशी येथून गंगेचे पाणी घेऊन ते दक्षिणेकडे रामेराश्वला वाहण्यासाठी खूप दूरचा प्रवास करून नाथ रामेश्वरास आले. रामेश्वराच्या देवळाकडे जाताना वाटेत वाळवंटात एक गाढव तहानेने तडफडताना पाहून नाथांनी आणलेले गंगेचे पाणी त्याला पाजले. त्याचा आत्मा तृप्त झाला.

हे नाथांचे कृत्य पाहून त्यांच्या बरोबरच्या इतर यात्रेकरूंनी नाथांना म्हटले: अहो, इतके कष्ट करून आणलेले गंगेचे पाणी शेवटी तुम्ही एका गाढवाला पाजलेत. काय हा वेडेपणा! नाथ म्हणाले: बाबांनो, प्रत्येक प्राण्याच्या ठिकाणी परमात्मा असतो. तो संतुष्ट झाला हे पाहून माझे पूर्ण समाधान झाले.

नाथांचा मुलगा हरिपंडित काशीस विद्याभ्यास करून मोठा पंडित होऊन पैठणास आला.

नाथांच्या कीर्तनप्रवचनास सर्वच जातींच्या लोकांनी एकत्र बसावे, हे त्याला आवडले नाही. आपल्या ज्ञानाचा त्याला गर्व झाला होता. त्याने नाथांना म्हटले, आता मी रोज प्रवचन करणार आहे. नाथांनी ठीक असे म्हटले. पण हरिपंडितांच्या प्रवचनाला चार-दोन ब्राह्मणांखेरीज कोणी येत नसे. हे पाहून हरिपंडिताला आपल्या वडिलांची थोरवी समजली. त्याने आपली चूक कबूल करून नाथांना पुन्हा प्रवचन व कीर्तन करण्यास विनंती केली. नाथांनी ठीक आहे असे म्हणून पुन्हा आपला रोजचा कीर्तन-प्रवचनाचा कार्यक्रम सुरू केला. सगळ्यांना समाधान वाटले. नाथांच्या कीर्तनाला खूप गर्दी होऊ लागली.

नाथांवर भगवंताची फार मोठी कृपा होती. असे म्हणतात की, प्रत्यक्ष भगवंत एका ब्राह्मणाच्या रूपाने नाथांकडे त्यांच्या सेवेसाठी येऊन राहिला होता. त्यासंबंधी एक श्लोक प्रसिद्ध आहे तो असा—

श्रीएकनाथ सदनी माधवजी सर्व काम हे करितो।
स्वकरे चंदन घाशी, गंगेचे पाणी कावडी भरितो॥

नाथांवर हे केवढे प्रेम !

नाथांवरच्या भगवंताच्या प्रेमाच्या अनेक गोष्टी सांगतात.

नाथ जातिभेद न मानता सर्वांशी समभावाने वागतात, हे काशीहून पंडित होऊन आलेल्या त्यांच्या मुलाला आवडत नसे. एकदा तर तो नाथांवर खूप रागावला व आपल्या पत्नीला व दोन मुलांना घेऊन काशीला निघून गेला. नाथांनी त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला, पण त्याने काही ऐकले नाही. नाथांना वाईट वाटले.

पुढे काही दिवसांनंतर नाथ स्वतः काशीस गेले. त्यांनी हरिपंडिताच्या सगळ्या अटी मान्य केल्या व त्याला परत पैठणास घेऊन आले. नाथांनी मान्य केलेल्या अटीत एक अट अशी होती की, नाथांनी परान्न घेता कामा नये.

पैठणात एक गरीब स्त्री राहात होती. पूर्वी ती चांगली श्रीमंत होती; पण पतीच्या मृत्यूनंतर तिची स्थिती अगदी खालावली. तिची फार पूर्वीपासून इच्छा होती की, आपण सहस्र भोजन घालावे. पण ते आता शक्य नव्हते. तिला त्या गोष्टीचे दुःख होई. तिला कोणी असे सांगितले की, एका सत्पुरुषास भोजन घातल्यास सहस्र भोजनाचे पुण्य मिळते. ती नाथांकडे गेली व तिने आपली सगळी हकिकत नाथांस सांगितली.

नाथांना तिची दया आली व त्यांनी तिच्याकडे भोजनास जावयाचे ठरविले. तोच हरिपंडित रागाने म्हणाला, बाबा, परान्न न घेण्याचे तुम्ही कबूल केले आहे; तेव्हा तुम्हाला ह्या बाईकडे भोजन करता येणार नाही. शेवटी हरिपंडिताने

त्या बाईच्या घरी जाऊन जेवण तयार करावे व नाथांना वाढावे असे ठरले.

ठरल्या दिवशी हरिपंडिताने त्या बाईकडे जाऊन जेवण केले. नाथ व हरिपंडित दोघेही जेवले. बाईंना समाधान वाटले.

भोजन झाल्यावर हरिपंडिताने दोघांच्या पत्रावळी गोळा करून बाहेर टाकल्या व आत येऊन पाहतो तो नाथांच्या



पत्रावळीच्या ठिकाणी तशीच दुसरी पत्रावळ दिसली. ती उचलून हरिपंडिताने बाहेर नेऊन टाकली व आत येऊन पाहतो तो पुन्हा तिथे पत्रावळ होतीच ! असे हजार वेळा झाले.

हा प्रकार पाहून हरिपंडिताचा गर्व नाहीसा झाला. त्याला नाथांची योग्यता कळून आली. तो नाथांना शरण गेला. असे नाथ भगवंताचे आवडते भक्त होते.

एकदा नाथांच्या घरी वडिलांचे श्राद्ध होते. त्या दिवशी

ब्राह्मण–भोजनासाठी स्वयंपाक तयार केला होता. ब्राह्मण येण्यापूर्वी रस्त्याने जाणाऱ्या हरिजनांना सुंदर स्वयंपाकाचा वास आला. ते थोडा वेळ तेथे थांबले. ही गोष्ट नाथांच्या लक्षात आली. त्यांनी लागलीच पाने तयार करून त्या सर्व हरिजनांना भोजन दिले. ब्राह्मणांच्या रागाची त्यांनी पर्वा केली नाही. असे होते नाथ मोठे कनवाळू.

## नाथांचे वाङ्मय

नाथांनी सामान्य जनांसाठी संस्कृत ग्रंथांचे मराठी भाषेत सुंदर भाषांतर केले. त्याबद्दलही पैठणातील ब्राह्मणांचा नाथांवर राग होता. पण नाथ डगमगले नाहीत. त्यांनी शांतपणे आपले काम पुढे चालू ठेविले. नाथांचा प्रसिद्ध ग्रंथ म्हणजे भागवताचे सुरस भाषांतर होय. तो ग्रंथ एकनाथी भागवत ह्या नावाने आजही प्रसिद्ध आहे.

त्यांचा दुसरा ग्रंथ भावार्थ रामायण हा होय. ह्याशिवाय त्यांनी ज्ञानेश्वरीचे संशोधनही केले आहे.

शिवाय नाथांनी अगदी सोप्या भाषेत अभंग, श्लोक, गवळणी आणि भारुडे रचिली आहेत.

"विंचू चावला, विंचू चावला"...असे एक भारूड अनेक वेळा रेडिओवर तुम्ही ऐकिले असेल, ते नाथांचेच आहे. नाथ आपल्या प्रत्येक भजनाचे शेवटी " एका जनार्दनी–असा उल्लेख करतात यावरून त्यांची गुरूभक्ती दिसून येते.

मुलांनो, तुम्ही मोठे झाल्यावर नाथांचे ग्रंथ वाचा म्हणजे त्यांची थोरवी तुम्हाला कळेल.

## नाथांचे निर्याण !

अशा प्रकारे नाथांनी अनेक वर्षे लोकांची सेवा केली. संसार सुखाने करूनही भगवंताची भक्ती करता येते, ही गोष्ट नाथांनी आपल्या कृतीने दाखवून दिली.

नाथांची त्यांच्या गुरूवर फार भक्ती होती. जनार्दनस्वामींची जन्मतिथी व निर्याणतिथी एकच म्हणजे फाल्गुन वद्य षष्ठी. ह्या दिवशी व कृष्णजन्माच्या दिवशी पैठणास नाथ मोठा उत्सव साजरा करीत. आजही पैठणला हे दोन उत्सव मोठ्या उत्साहाने साजरे होतात.


आता नाथ वृद्ध झाले होते. एकदा त्यांनी उद्धवाला म्हटले, उद्धवा, ह्या वर्षी फाल्गुन वद्य षष्ठीला मोठा उत्सव साजरा करायचा आहे. उद्धव हा नाथांचा दूरचा नातलग असून तो नाथांकडेच राहून नाथांच्या घरची सगळी व्यवस्था पाहत असे.

नाथांनी उत्सवाबद्दल सांगताच तो म्हणाला महाराज, ह्या षष्ठीचे एवढे महत्त्व काय ?

नाथ म्हणाले, फाल्गुन वद्य षष्ठीचे फार महत्त्व आहे.

माझ्या गुरुजींचा हा जन्मदिवस व निर्याणदिवस. मला प्रथम देवगडावर स्वामींचे दर्शन ह्याच दिवशी झाले आणि आता आमचे शेवटचे निर्याणही ह्याच दिवशी होणार !

ही वार्ता ऐकून सगळे पैठण दुःखी झाले. नाथांच्या कीर्तनाला खूप गर्दी जमू लागली.



नाथ भावार्थ रामायण सांगत होते. आता हे रामायण पुरे कसे होणार म्हणून लोकांनी नाथांना विचारले, तेव्हा नाथांनी म्हटले, माझा गावबा ते पुरे करील. लोकांना मोठे नवल वाटले; कारण गावबाला धड बोलताही येत नव्हते; पण त्याची नाथांवर फार भक्ती होती.

नाथ आपल्या जागेवरून उठले व त्यांनी गावबाला आपल्या जागी बसवून त्याला म्हटले, हं गावबा, करा सुरुवात. तो काय आश्चर्य ! गावबा भराभर पुढच्या ओव्या रचून म्हणू लागला. लोक चकित झाले. त्यांना नाथांची थोरवी पूर्णपणे

कळली; कारण गावबासारख्या अडाण्यालाही नाथांच्या कृपेने उत्तम कवित्व करता येऊ लागले.

असो. येत्या फाल्गुन वद्य षष्ठीला आपण निर्याण करणार असे नाथांनी आधीच म्हटले होते. हा षष्ठीचा दिवस जसजसा जवळ येऊ लागला तसतसे लोक बेचैन होऊ लागले. ते आपला बहुतेक वेळ नाथांजवळ राहून घालवू लागले.

अखेर शके १५२१ च्या फाल्गुन वद्य षष्ठीचा दिवस उजाडला. सगळीकडे गडबड सुरू झाली. नाथांनी सकाळी पूजा आटोपली. जमलेल्या सर्वांना भोजन दिले नि दुपारी दिंडीसह नाथ नदीच्या वाळवंटाकडे निघाले. तेथे नाथांनी अखेरचे कीर्तन केले. नंतर नाथ अतिशय शांत मनाने नदीच्या पात्रात शिरले व दिसेनासे झाले! त्यांच्या गळ्यातील पुष्पहार तरंगू लागले. नाथांनी देह विसर्जित केला होता.

नंतर गोदावरी नदीच्या पात्रातून नाथांचा देह शोधून काढण्यात आला व त्याला अग्निसंस्कार केला. दुसऱ्या दिवशी नाथांची रक्षा गोळा करण्याच्या वेळी तेथे सारे पैठण शहर लोटले.

नाथांचा जेथे अग्निसंस्कार झाला तेथे एक पिंपळाचे रोप उगवलेले पाहून सर्वांनाच आश्चर्य वाटले, व सर्वांनी मोठ्या भक्तिभावाने हात जोडले.

अशा प्रकारे एका थोर महात्म्या संताचे चरित्र संपले.

★ म. ग्रं. सं. ठाणे, ... ग्रंथालय ठाणे.
... ना. ...
... २१ ...
दिनांक

# संत भानुदास

मुलांनो, आतापर्यंत तुम्ही ज्या संत एकनाथांचे चरित्र वाचलेत त्या एकनाथांचे पणजोबा संत भानुदास म्हणून होते. त्यांची भगवंतावर फार भक्ती होती.

त्यांच्यासंबंधी एक गोष्ट सांगून व एकनाथांची एक-दोन भजने व भारूडे देऊन हे छोटे चरित्र पुरे करू.

नाथांचे पणजोबा संत भानुदास ह्यांची श्रीविठ्ठलावर फार भक्ती होती.

त्या काळी विजयनगरच्या राजाची श्रीविठ्ठलावर मोठी भक्ती. एकदा त्या राजाने विठ्ठलाची प्रार्थना करून विठ्ठलाला पंढरपुराहून विजयनगरला नेले. पण श्रीपांडुरंगाने राजाला एक अट घातली की, मी विजयनगरला येतो पण जर तुझ्या हातून माझ्या भक्तांचा छळ झाला तर मात्र मी तावडतोब पंढरपुरास निघून जाईन. राजाने अट मान्य केली व मोठा उत्सव करीत देवाला विजयनगरला आणले.

पुढे लवकरच आषाढी एकादशीची यात्रा आली. अनेक भक्त पंढरपुरास आले, पण पांडुरंग तेथे नव्हता. सगळेजण मोठ्या काळजीत पडले. इतक्यात भानुदास पुढे होऊन म्हणाले मी आणतो पांडुरंगाला शोधून.

भानुदास तडक विजयनगरला आले. ती रात्रीची वेळ

होती. ज्या देवळात पांडुरंग होता तेथे खूप बंदोबस्त असून देवळाच्या दरवाजांना कुलुपे लावली होती. पण भानुदास तेथे येताच कुलुपे गळून पडली नि भानुदास देवासमोर जाऊन उभे राहिले व म्हणाले : पांडुरंगा चला पंढरीला. मी तुम्हांला नेण्यासाठी आलो आहे.

नंतर भानुदासांनी देवाची खूप स्तुती केली. देवाने प्रसन्न होऊन आपल्या गळ्यातील रत्नांचा हार भानुदासांच्या गळ्यात घातला; व पहाट झाली आहे, लवकर देवळाबाहेर जा असे भानु-दासांना सांगितले.

सकाळी पहारेकऱ्यांनी भानुदासांना पकडून राजाकडे आणले. राजाने देवाचा हार चोरल्याबद्दल भानुदासांना सुळी देण्याचा हुकूम दिला.

लोखंडी सूळ जमिनीत पुरताच त्याला पालवी फुटली. हा चमत्कार सेवकांनी राजाला कळविला.

तो चमत्कार ऐकून राजाला भानुदासांच्या भक्तीची थोरवी समजली व लगेच त्याने भानुदासांची क्षमा मागितली.

नंतर राजा देवळात आला, तो देव त्याला म्हणाला, तू माझ्या थोर भक्ताचा अपमान केलास. आता मी पंढरपुरास जाणार. लगेच पांडुरंग भानुदासांबरोबर पंढरीस निघून आला.

अशा पुण्यवंतांच्या कुळात एकनाथ जन्माला आले होते. त्यांनी ईश्वरभक्तीची आपली कुलपरंपरा उत्तम प्रकारे राखली.

देवाबद्दल एकनाथ म्हणतात--

आवडीने भावे हरीनाम घेसी। तुझी चिंता त्यासी सर्व आहे।
नको खेद करू कोणत्या गोष्टींचा । पती लक्ष्मीचा जाणतसे।
सकळ जीवांचा करितो सांभाळ। तुज मुकलील ऐसे नाही।
जैसी स्थिती आहे तैशापरी राहे। कौतुक तू पाहे संचिताचे।
एका जनार्दनी भोग प्रारब्धाचा। हरिकृपे त्याचा नाश झाला ।।

देवाबद्दल एकनाथांचे एक गमतीचे गाणे—

असा कसा देवाचा देव बाई ठकडा । देव एका पायाने लंगडा।
वाळवंटी जातो कीर्तन करितो। घेतो साधुसंतांसी झगडा।
गवळ्या घरी जातो। दहीदुध खातो। करि दह्यादुधाचा रगडा।
एका जनार्दनी भिक्षावाढा बाई। देव साधूसंतांचा ठकडा।

नाथांचे एक भारूड—

विंचु चावला। विंचु चावला।
काम क्रोध विंचू चावला। तम घाम अंगासी आला ।।
पंचप्राण व्याकुळ झाले। सर्व अंगाचा दाह झाला ।। १ ।।
मनुष्य इंगळी अति दारुण । मज नांगा मारिला त्याने ।।
त्याने सर्वांगी वेदना जाण । त्या इंगळीची ।। २ ।।
ह्या विंचवाला उतारा । तमोगुण मागे सारा ।।
सत्वगुण लावा अंगारा । विंचू इंगळी उतरे झरझरा ।। ३ ।।
सत्य उतारा घेऊन । अवघा सारिला तमोगुण ।।
किंचित राहिली फुणफुण । शांत केली जनार्दने ।। ४ ।।

ग्रं. सं. ठाणें,

४२८

BVBK-0400428